# इडियटस्‌की पाठशाला : वेध

– डॉ. आनंद नाडकर्णी

२० जानेवारी २०१३ आत्ताच दोन तासांपूर्वी लातूर शहरामध्ये, वेध व्यवसाय प्रबोधन परिषदेचे दुसरे आवर्तन संपन्न झाले. ठाण्यामध्ये बावीस वर्षांपूर्वी सुरू झालेला हा वार्षिक उपक्रम, विद्यार्थी-पालक, शिक्षक ह्यांना भविष्याची दिशा दाखवणारा, विविध क्षेत्रातल्या 'रोल मॉडेल्स' बरोबर मुक्त संवादाची संधी देणारा. ठाण्याबरोबरच आता महाराष्ट्रातल्या सहा शहरांमध्ये पसरलेला लातूर मधले हे दुसरे वर्ष. परिषदेचे विचारसूत्र होते, 'कर्तृत्वाचे मोजमाप' दोन दिवस आधीच सर्व प्रवेशिका संपलेल्या. 'वेध'चे कार्यकर्ते मला सांगत होते की पुढच्या वर्षी मांडवच घालावा लागणार एवढा प्रतिसाद आहे. लातूर शहरातल्या शाळांबरोबरच भोवतालच्या ग्रामीण शाळांमधले विद्यार्थी-शिक्षकही मोठ्या संख्येने हजर होते. आणि कुणाला ऐकायला? ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. रुपा रेगे-नित्सुरे, साहसी खेळांचा प्रसार करणारे प्रसाद पुरंदरे, कोर्टातील वकिलीला सामाजिक चळवळीची जोड देणारे असीम सरोदे, मराठवाड्यातून मुंबईला जाऊन सिनेसृष्टीत कलादिग्दर्शक म्हणून जम बसवलेले नरेंद्र राहुरीकर आणि तरुण अभिनेत्री स्पृहा जोशी... ही यादी पाहिल्यावर आपल्या लक्षात येईल की स्पृहाचा अपवाद सोडला तर ग्लॅमरचे वलय कुणाही भोवती नाही. तरीही प्रचंड प्रतिसाद.

ह्या पाच मुलाखतींमधून विद्यार्थ्यांसमोर, पालकांसमोर आलेली सूत्रे कशी होती?... कर्तृत्वाचे मोजमाप करण्यासाठी लावायच्या पैसा, प्रसिद्धी ह्या फूटपट्ट्या अगदीच अल्पायुषी आहेत. आपल्याला आंतरिक समाधान देते ते कर्तृत्व. मुक्कामापेक्षा प्रवासाला महत्त्व दिल्याने जगणे अधिक रसरशीत बनते. मग त्यासाठी कोणत्याही स्पर्धेत उतरणे अटळ बनत नाही. प्रसाद पुरंदरे म्हणाले तसे 'शिक्षणाचा ध्रुवतारा' म्हणजे शिवाजी महाराज आणि ज्ञानेश्वर!... ज्यांच्या विचारांचा प्रभाव अनेक वर्षे टिकतो ती खरी कर्तृत्ववान माणसे. ज्यांच्या विषयी अनेक जणांच्या मनात कृतज्ञता असते तो माणूस कर्तृत्ववान. आपले कर्तृत्व जगापुढे न मिरवता जी व्यक्ती सर्वांमध्ये विरघळते ती ग्रेट... स्वत:च्या आणि फक्त स्वत:च्या संकुचित स्वार्थाला व्यापक केल्याशिवाय माणूस कर्तृत्ववान ठरतच नाही... अगदी रसरशीतपणे, स्वानुभवातून पाचही जणांनी हे सारे ठासून मांडलेच. गंमत म्हणजे जमलेल्या विद्यार्थ्यांपैकी अक्षरश: शेकडो जणांनी त्यांच्या लेखी प्रतिक्रियांमध्ये ह्याच विचाराचा प्रतिध्वनी दिला... कार्यक्रम संपल्यावर एकजण म्हणाले, "अहो, लातूर पॅटर्न'च्या संपूर्ण विरोधातली मांडणी हा तुमचा वेध करतोय... आणि त्याला शेकडो-हजारोंचा प्रतिसाद मिळतोय... काही खरं नाही!

मी म्हणालो, "कुणाचं खरं नाही?..."

"अहो असे विचार खरेच रुजले, फोफावले तर 'लातूर पॅटर्न' वर ज्यांनी शिक्षणाचा बाजार मांडलाय त्याचे खरं नाही..." ते म्हणाले.

"असा दिवस कधी येईल, येईल की नाही ह्याबद्दल मला काहीच शाश्वती नाही... पण खऱ्या विकासाची दिशा दाखवणारी व्यासपीठे टिकत नाहीत, लोकप्रिय होत नाहीत हा समज काहीसा दुबळा करता आला तरी तेही काम महत्त्वाचे आहे..." मी म्हणालो.

आपला हेतू शुद्ध असेल, भविष्यातल्या समाजाबद्दलची कळकळ असेल तर योग्य संघटन, नियोजन ह्याचा उपयोग करून विधायक उपक्रम करता येतात... एका ठिकाणी नव्हे तर अनेक ठिकाणी आणि संवेदना बोथट झाल्या आहेत, आत्मकेंद्रीत झाले आहेत असे आरोप आपण ज्यांच्यावर करतो ती तरुण पिढी आपल्याला चक्क प्रगल्भ प्रतिसाद देते.

२०१२ साल हे नगरचे सातवे वर्ष. विचारसूत्र होते 'पायाकडून कळसाकडे'. ह्या सूत्राच्या भोवती मी शीर्षकगीत रचले होते. ते असे

चिरा असे चिरंतन पायाशी भुईत ।
कळस कवेत घेई आकाशाचे गीत ।।

सकाळी सकाळीच विद्यार्थी पालकांनी सारा मंडप भरून टाकला. ह्या परिषदेच्या सलामीच्या सत्रात होत्या माणदेश महिला सहकारी बँकेच्या संस्थापक चेतना गाला-सिन्हा, माणसेशासारख्या दुष्काळी भागामध्ये महिलांना सर्व बाजूंनी सक्षम बनवणारी चळवळ त्यांनी सुरू केली. मुंबईमध्ये बालपण-तरुणपण गेलेले असतानाही खेड्यातले आयुष्य स्वीकारले. अमेरिकेचे अध्यक्ष ओबामा जेव्हा भारतभेटीला आले तेव्हा त्यांनी भेटीला बोलावलेल्या सामाजिक उद्योजकांमध्ये चेतनादीदींना मानाचे आमंत्रण होते. त्यानंतर होता तरुण चित्रकर्मी नागराज मंजुळे. भटक्या जमातीतील जन्म. त्या साऱ्या रखरखीत वास्तवामधून नागराजने स्वत: मधल्या कलाकाराला, कवीला कसा आकार दिला हा प्रवास थक्क करणारा. त्याने तयार केलेल्या लघुपटाला राष्ट्रीय पारितोषिक मिळाले. आंतरराष्ट्रीय महोत्सवांमध्ये मानाचे पान मिळाले. पायाकडून कळसाकडे अशी आगळी वाटचाल. त्यानंतर होता ज्येष्ठ अभिनेता किशोर कदम अर्थात कवी सौमित्र. मुंबईच्या आमवस्तीपासून त्याच्या प्रवासाला सुरुवात झाली. स्वत:मधले गुण स्वत:ला समजणे आणि स्वकष्टाने त्याला खतपाणी घालणे हा मार्ग एका बाजूने कष्टाचा तर दुसऱ्या बाजूने समाधान देणारा. पण ह्या संमेलनाचे खरे हिरो ठरले तीन ग्रामीण तरुण. आदिनाथ दहिफळे हा उसतोडणी कामगाराचा मुलगा. मराठी माध्यमामध्ये शिकून स्वावलंबनाने आय.आय.टी. (पवई) येथून एम.टेक. केलेला. विजय पवार हा आजही लोहार काम करून बी.सी.ए. करणारा तरुण. व्यसनाधीन वडिलांना त्यांच्या अवगुणासकट स्वीकारणारा. वडिलांच्या अपमृत्यूनंतर स्वत:बरोबर कुटुंबाला सावरणारा. तिसरा तरुण रोहीदास गाडे. घरी अठरा विश्वे दारिद्र्य आणि वडिलांच्या हमालीच्या व्यवसायातील अपघाती निधनानंतर अनेक नोकऱ्या करत 'आर्ट टिचर्स डिप्लोमा' उत्तीर्ण झालेला. सध्या गवंडीकाम करत त्यातून कागद रंगासाठी पैसे उभे करणारा. आपले अनुभव सांगताना रोहीदासच्या डोळ्यात पाणी आले. त्याला पुढे बोलता येईना... आदिनाथ आणि विजयने त्याच्या खांद्यावर हात ठेवले. समोरचे तीन हजार चेहरे त्याच्या वेदनेबरोबर एकतान झाले... सारा मंडप नि:शब्द. साऱ्यांनी रोहीदासला उसंत दिली. त्या मूक पाठिंब्याने हलून गेलेल्या रोहीदासने आमच्यासमोर एक सुरेख जलचित्र काढले... दुपारी तीन वाजता कार्यक्रम संपल्यावर मुलामुलींनी मला गराडा घातला... प्रत्येकाला मला सांगायचे होते त्यांना ह्या दिवसाने काय दिले... आपण बोलतो माध्यमांच्या आक्रमणाबद्दल. टीव्ही, इंटरनेट, फेसबुकच्या ॲडिक्शनबद्दल. थेट संवादाची पर्यायी व्यासपीठे निर्माण करण्याचा प्रयत्न मात्र करत नाही आणि भाषण परिसंवादाच्या नेहमीच्या घोळातून बाहेर पडत नाही. नेटकी आणि देखणी रंगमंचीय मांडणी, दीपप्रज्वलनासहीत सर्व उपचारांना काटा आणि प्रत्येक मिनीटाचा ध्येयपूर्तीसाठी वापर असे प्रयोग केल्याशिवाय तरुण मने कशी आकर्षित होतील? व्याख्याने आणि उपदेशामृताला, सरळ भिडणाऱ्या गप्पांच्या शैलीत परिवर्तित केल्याशिवाय त्यांचे अवधान टिकून कसे राहील?...

महाराष्ट्रातल्या आजवरच्या बेचाळीस वेध परिषदांचा माझा अनुभव मला सांगतो की संवादपीठाची ताकद वाढत गेली तर रुढार्थाने एकही 'सेलेब्रिटी' नसताना हजारो मने दिवसाचे सात-आठ तास गाण्याच्या मैफिलीसारखे विचारधन स्वीकारतात... गेल्या डिसेंबरातल्या नाशिक वेधचा अनुभवही असाच. मार्केटिंग क्षेत्राला वेगळा चेहरा देणारे प्रदीप लोखंडे, व्यसनमुक्ती चळवळीतल्या कार्यकर्त्या मुक्ता पुणतांबेकर, तरुण आणि धैर्यवान पशुआरोग्यतज्ज्ञ डॉ. विनया जंगले, नेटवरचा शब्दकोश तयार करणारा तरुण उद्योजक सुनिल खांडबहाळे, ऐन पंचविशीमध्ये हिमोग्लोबीन मापण्याचे सुईविरहीत यंत्र तयार करणारा डॉक्टर-इंजिनिअर (नायर हॉस्पिटल आणि आयआयटी) डॉ. अभिषेक सेन आणि बारावीमध्ये केमेस्ट्रीमध्ये ३५ मार्क (बोर्डाच्या चुकीने) मिळाल्यावर नाऊमेद न होता पर्यावरणामध्ये डॉक्टरेट करणारा रोहन शेट्टी!... ही सारी व्यक्तिमत्त्वे आहेत खूपच इंटरेस्टींग, पण ती गर्दी खेचणारी म्हणता येणार नाहीत. नाशिकमधले वेधचे दुसरेच वर्ष, आयोजक थोडे चिंतेमध्ये होते. विद्यार्थी-पालक येतील का? सकाळी नऊ

ते सायंकाळी पाच बसतील का?

रविवार, दोन डिसेंबरची सकाळ उजाडली. आणि एक-दोन नाही २८०० विद्यार्थी-पालकांनी सभागृह भरून टाकले. ग्रामीण भागातील दोन-तीनशे तरुणतरुणी... एक एक सत्र रंगत गेले. सिरियल पहाताना तन्मय व्हावे तसा श्रोत्यांचा प्रतिसाद... तुमच्या लक्षात येईल करीयरचा राजमार्ग ज्याला म्हणावे असा एकही पर्याय आम्ही त्यांच्यापुढे ठेवत नव्हतो... मार्कांची टक्केवारी, 'सीइटीची मेहनत', क्लासेस आणि कोचिंगची अपरिहार्यता ह्या साऱ्याला थेट छेद देणारे विचार असे ज्यांनी केले तेच मांडत होते. आमचा तरुण अभिषेक आणि रोहन तर चक्क 'रांचो' होते. म्हणजे रांचोची व्यक्तिरेखा ह्यांच्यावरून घेतल्यासारखी वाटावी... सप्टेंबर २०१२ मध्ये पुण्याच्या वेधची थीम होती 'सफर संशोधनाची' त्यात आम्ही 'रांचो'वृत्तीची चक्क पाच उदाहरणे विद्यार्थी-पालकांसमोर ठेवली होती. स्वत:च्या मर्यादित प्रगतीच्या पलिकडे पहाण्याच्या अनेक वाटा असतात. ह्या वाटांमध्येच जीवनाचे 'श्रेयस' दडलेले असते असा मेसेज आजच्या जीवघेण्या स्पर्धेच्या युगात अतिशय प्रभावीपणे मांडला तर ग्रहण केला जातो हा अनुभव वारंवार येतो. १३ जानेवारी २०१२ ला झालेल्या सहाव्या औरंगाबाद वेधमध्ये संतोष गर्जे नावाच्या गेवराईच्या तरुणाने साऱ्यांना असेच थक्क केले. संतोषसुद्धा ऊसतोडणी कामगाराचा मुलगा. आई आणि बाबा वर्षातले सहा-आठ महिने दूर. संतोष आणि त्याची मोठी बहीण घर, शेती सांभाळून स्वत:चे शिक्षण करायचे वयाच्या पाचव्या वर्षापासून. संतोष दहावीला असताना आईच्या ठिकाणी असलेल्या बहिणीचे लग्न झाले. ही ताई आणि तिचे बाळ बाळंतपणात दगावले. त्या धक्क्याने संतोषचे वडील परागंदा झाले. बारावी झालेला संतोष अनाथ झाला. स्वत:च्या दु:खाला तोंड देतादेता त्याने विचार केला, आपण अनाथ आहोत पण निदान सज्ञान तरी आहोत. अगदी बालपणातच अनाथ झालेल्यांचे काय... गेली आठ वर्षे हा संतोष पंचेचाळीस अनाथ मुलांना सांभाळतो आहे. चिमणीप्रमाणे काडीकाडी आणून घर बांधतो आहे. दाणा-दाणा वेचून त्यांच्या तोंडात घालतो आहे... आमचा संवाद संपल्यावर इतका प्रिय झाला की त्याची स्वाक्षरी घ्यायला गराडा. पण महत्त्वाचे म्हणजे त्याच्या कार्याला त्याच क्षणी भरघोस आर्थिक पाठिंबाही मिळाला. ठाण्याचा वेध मध्ये डिसेंबर २०१२ मध्ये काश्मीरमध्ये अनाथ मुलांना घर देणाऱ्या अधिक कदमला चार हजार विद्यार्थी-पालकांनी असाच प्रतिसाद दिला होता...

आपण म्हणतो 'रोल मॉडेल्स' कुठे आहेत?... तर जागोजागी आहेत. त्यांना शोधायला हवे. योग्य पद्धतीने समाजासमोर सादर करायला हवे. रसरशीत जगण्याचे नवेनवे आयाम तरुणांसमोर आणणे गरजेचे आहे. 'स्वान्त सुखाय'ची गुंगी कमी करायची तर अशी इंजेक्शने सातत्याने द्यायला हवीत. सुदैवाने वेधचे सारे अनुभव आम्ही डिव्हीडी माध्यमातून डॉक्युमेंट करत असतो. लवकरच ह्या सर्व अनुभवाचा एकत्र साठा नेटवर उपलब्ध करणार आहोत. गंमत म्हणजे एक नव्हे तर सात शहरांमध्ये हा उपक्रम यशस्वीपणे आयोजित करणारे कार्यकर्त्यांचे गट एकत्र आले आहेत. आणि येत्या काही वर्षांमध्ये हे लोण फोफावत जाण्याची दाट शक्यता दिसते आहे.

२०१२-२०१३ च्या वेध 'हंगामा' मध्ये मी एकूण चव्वेचाळीस व्यक्तीमत्त्वांबरोबर गप्पा मारल्या. त्यासाठी त्यांच्याबद्दलचा जो अभ्यास करायचा होता तो आनंदाने केला. बावीस वर्षांमधल्या बेचाळीस परिषदांमध्ये मला अशा चारशेहून अधिक व्यक्तीबरोबरच्या गप्पांमधून स्वत:ला समृद्ध करता आले आहे. परंतु गेल्या तीन वर्षांमध्ये हे व्यासपीठ अजूनच बदलले आहे. 'सेलिब्रिटी' नावाच्या वलयाच्या पल्याड गेले आहे. इथे वेगळे विचार मिळतात हा विश्वास आता व्यक्तीच्या महत्तेच्या पुढे गेला आहे... चतुर आणि रांचो ह्यांच्या स्पर्धेमध्ये इथेही रांचो सशक्तपणे आणि ठामपणे उभा राहू शकतो आहे हा दिलासा खूपच मोठा आहे... अशी 'इडियटोंकी पाठशाला' वेगवेगळ्या गावामध्ये वेगवेगळ्या स्वरुपामध्ये सुरू होते आहे हे पुढचे पाऊल!... आत्मकेंद्रीततेचा प्रवाह तर बेटा लई जोरदार आहे पण विरुद्ध पोहणाऱ्यांची संख्याही नगण्य नाही... काटक्या मोडणे खूप झाले.. चला मोळी बांधून तिचा प्रशस्त तराफा करु या!

**- डॉ. आनंद नाडकर्णी**

(मितुले आणि रसाळ मधून)